Exh-1/B

**मे.दिवाणी न्यायाधिश साहेब, कस्तर, न्यायालय अंबाजोगाई जि.बीड**

कि.दि.अर्ज नं.      /२०२६.









**अर्जदार** :- १) दिलीपराव पिता भगवानराव लोमटे वय ७६ वर्ष धंदा शेती,रा.काळा मारुती मंदिर जवळ, अंबाजोगाई जि.बीड.

२) मेघराज पिता दिलीपराव लोमटे वय ४५ वर्ष धंदा शेती, रा.काळा मारुती मंदिर जवळ, अंबाजोगाई जि.बीड.

३) युवराज पिता दिलीपराव लोमटे वय 43 वर्ष धंदा शेती, रा.खडकपुरा, अंबाजोगाई ता.अंबाजोगाई जि.बीड.

४) सौ.ज्योती भ्र.बालासाहेब देशमुख वय ३७ वर्ष धंदा घरकाम, रा.गित्ता ता.अंबाजोगाई जि.बीड.

**विरुध्द**

**गैरअर्जदार**:- ... कोणीही नाही. ......

**प्रकरण** :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

दिलीप

**अर्जदारांचा अर्ज वारस प्रमाणपत्र मिळण्या करीता खालील प्रमाणे सादर आहे.**

१) हे की, अर्जदार क्र.१ ते ३ हे शहर कसबे अंबाजोगाई जि.बीड येथील रहीवाशी असुन अर्जदार क्र.१ हे अर्जदार क्र.२ ते ४ चे जन्मदाते वडील आहेत.

मेघराज

युवराज

ज्योती

२) हे की, अर्जदार क्र.१ ची पत्नी म्हणजेच अर्जदार क्र.२ ते ४ यांच्या जन्मदात्या आई नामे दैवशाला भ्र.दिलीप लोमटे रा.अंबाजोगाई

पान नं.२ वर ...

जि.बीड या दिनांक ०१/०५/२०२५ रोजी राहते स्वामी रामानंद तिर्थ ग्रामीण शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय अंबाजोगाई येथे मयत झाल्या आहेत. सोबत रुग्णालयाने दिलेले मयताचे मृत्यु प्रमाणपत्र दाखल आहे.

३) हे की, मयत दैवशाला भ्र.दिलीप लोमटे यांच्या माघारी यातील अर्जदार क्र.१ मयताचे पती, अर्जदार क्र.२ व ३ मयताची मुले आणि अर्जदार क्र.४ मयताची मुलगी या नात्याने कायदेशिर वारस आहेत. अर्जदार क्र.१ ते ४ यांच्या शिवाय मयत दैवशाला भ्र.दिलीप लोमटे यांचे माघारी अन्य कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

४) हे की, अर्जदारांना शासकिय आणि निमशासकिय कार्यालयीन कामा करीता अर्जदार क्र.१ ते ४ हे मयत दैवशाला भ्र.दिलीप लोमटे यांचे कायदेशिर वारस असल्या बाबतचे वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

दिलीप

५) हे की, अर्जदारांनी यापुर्वी अन्य कोणत्याही न्यायालयात अशा प्रकारचे प्रमाणपत्र मिळण्या करीता कार्यवाही दाखल केलेली नाही.

मेघराज

युवराज

६) हे की, प्रस्तुत प्रकरणाच्या अनुशंगाने काढाव्या लागणाऱ्या जाहीर प्रगटनाचा खर्च अर्जदार मा.कोर्टात जमा करण्यास तयार आहेत.

ज्योती

७) हे की, यातील अर्जदार आणि मयत व मयताचे मृत्यु ठिकाण हे सर्व मा.कोर्टाचे स्थळ सिमेचे आतील असल्याने प्रस्तुतचे प्रकरण मा.कोर्टात दाखल करण्यात येत आहे, जे मा.कोर्टास दाखल करुन घेवुन निकाली काढण्याचा अधिकार आहे.

पान नं.३ वर ....

८) हे की, अर्जदार सदर प्रकरणी आवश्यक ती कोर्ट फिस सोबत दिली आहे, जी पुरेशी आहे.

अशा सर्व परिस्थितीत मयत दैवशाला भ्र.दिलीप लोमटे रा.अंबाजोगाई जि.बीड यांचे यातील अर्जदार क्र.१ ते ४ हे कायदेशिर वारस असल्याचे वारसा प्रमाणपत्र अर्जदारांच्या हक्कात दिले जाणे योग्य व आवश्यक आहे. सोबत अर्जदार क्र.२ चे शपथपत्र दाखल आहे.

## तरी विनंती की,

अर्ज मंजूर करण्यात यावा आणि मयत दैवशाला भ्र.दिलीप लोमटे रा.अंबाजोगाई जि.बीड यांचे यातील अर्जदार क्र.१ ते ४ हे कायदेशिर वारस असल्याचे वारसा प्रमाणपत्र अर्जदारांच्या हक्कात देण्यात यावे.

दिनांकः ०५/०१/२०२६.

**अर्जदार,**

दिलीप

१) दिलीपराव पिता भगवानराव लोमटे

मेघराज

२) मेघराज पिता दिलीपराव लोमटे

युवराज

३) युवराज पिता दिलीपराव लोमटे

ज्योती

४) सौ.ज्योती भ्र.बालासाहेब देशमुख

पान नं.४ वर ...

प्रतिज्ञेवर सत्य निवेदन करतोत की, प्रस्तुतच्या अर्जातील संपुर्ण मजकुर आमच्या माहिती आणि समजुती प्रमाणे खरा व बरोबर असुन यावर आम्ही आज आमच्या समजुन उमजुन स्वाक्षऱ्या केल्या आहेत, त्या खऱ्या आहेत.फ.

दिनांकः १९/०१/२०२६.

**अर्जदार,**

दिलीप

१) दिलीपराव पिता भगवानराव लोमटे

मेघराज

२) मेघराज पिता दिलीपराव लोमटे

युवराज

३) युवराज पिता दिलीपराव लोमटे

ज्योती

४) सौ.ज्योती भ्र.बालासाहेब देशमुख

मार्फतः

**ॲड.ओम ए.लोंढाळ,**

**अंबाजोगाई.**